


## जात्यावरच्या ओव्या......

लेकीला मागणं
घरी चौकाचा वाडा
जोडजम्याचा सोयरा
दारी वाजे चौघडा ||२५७||

लेकीला मागणं
लेक केळीचा खांब
मला कठायाचं नही
कशी देऊ हिला लांब? ||२५८||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## उदरभरण नोहे...





ज्योतिर्मय साहित्य

नाहीच जमले जायला तर घरी पार्सल मागवायला लागलो. पूर्वी एकत्र जेवणं व्हायची. जेवताना गप्पा व्हायच्या. एकमेकांची सुखदुःख समजून घेतली जायची. कुटुंबातले काही प्रश्न जेवणाच्या टेबलावर सुटायचे. दिवसभर वेगवेगळ्या कारणाने विखुरलेले कुटुंबातले सदस्य जेवणाच्या निमित्ताने एका जागी यायचे, भेटायचे, हास्यविनोद व्हायचे. हॉटेलात आम्ही सहकुटुंब जेवायला गेलो तरी मनाने कुठे एकत्र असतो ? प्रत्येक जण मोबाईलमध्ये डोके खुपसून बसलेला असतो. कोणाचे इतरत्र लक्ष असते. तसेच कोरडे जातो आम्ही आणि कोरडे येतो. मायेचा ओलावा असलेले प्रेमाचे दोन शब्द एकमेकांशी क्वचितच बोलले जातात.



आजकाल छोटी होत जाणारी कुटुंबे, घरातील नोकरी करणारे सदस्य यामुळे दररोज घरी स्वयंपाक करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही हे समजण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे वाढदिवस, छोटी पार्टी, समारंभ यासारख्या गोष्टींचे आयोजन करणे हॉटेलमध्ये सोयीचे होते हे देखील समजण्यासारखे आहे. परंतु घरी स्वयंपाक करणे आणि हॉटेलमध्ये जाणे या गोष्टींमध्ये सुरेख असं समन्वय साधणे शक्य आहे. आवश्यक प्रसंगी हॉटेलमध्ये जायला हरकत नाही परंतु इतर वेळी मात्र आवर्जून घरचेच जेवण घ्यायला हवे याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही.

असे म्हणतात की १९७१ मध्ये अमेरिकेत ७१% असलेली पारंपरिक कुटुंबे आज केवळ २० % वर आली आहेत. मग उरलेली माणसे गेली कुठे ? कहाँ गये वो लोग ? उत्तर फार विदारक आहे. बरीचशी मंडळी वृद्धाश्रमात आहेत. कोणी भाड्याच्या घरात एकट्याने जीवन कंठत आहेत. १५% स्त्रिया एकट्या राहतात, १२% पुरुष कुटुंबात असूनही एकाकी आहेत, ४१% मुले विवाहाबाहेर जन्माला येतात, आणि घटस्फोट दर पहिल्या लग्नात ५०%, दुसऱ्यात ६७% तर तिसऱ्यात तब्बल ७४% इतका आहे. हे सगळे हॉटेलात जाण्यामुळे झाले आहे असे माझे म्हणणे नाही. पण या सगळ्यांना जोडून ठेवणारा कुटुंब नावाचा जो घटक होता तो हरवला आहे. तो हरवण्यात कुठेतरी आमचं स्वयंपाकघर हरवलं आहे, त्याचाही वाटा आहे. भारतात अजून इतकी विदारक परिस्थिती नाही. पण निश्चितच ही कुठेतरी आमच्यासाठी धोक्याची घंटा आहे. जेवणाला आम्ही जेव्हा नुसते उदरभरण न समजता यज्ञकर्म समजू तेव्हा आरोग्याचेही प्रश्न आपोआप सुटतील.



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## बद्धलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

दशक ५, समास ७

नमस्कार

समाजातील सर्व माणसे ही एकसारखी नसतात. कोणी अतिशय हुशार असतात तर कोणी सर्वसामान्य विचार सरणीची असतात. पण काही जण मात्र जगातले सर्व ज्ञान फक्त माझ्या कडेच आहे आणि समोरचा कसा बेअकली आहे ह्या विचाराचे असतात. आणि अशी माणसे घमेंडखोर असतात. स्वतः ला खुप शहाणे समजतात. पण या लोकांची ही विचारसरणीखुप दिवस टिकत नाही. एक ना एक दिवस अशा लोकांचे पाय जमीनीवर येतात.

समर्थानी या लोकांच्या विषयावर हा समास बेतलेला आहे. तात्पर्य काय तर प्रत्येकाने साधकबाधक विचार करून वागावे. कधीही गर्व करू नये.


आता आपण पारमार्थिक क्षेत्रात बद्ध जीवांची लक्षणे अभ्यासु. पारमार्थिक प्रगति म्हणजे आरंभापासून अंतबिंदूकडे अधिकाधिक सरकणे होय. अज्ञान काय सांगते? तर अज्ञान सांगते की, मी खरा आहे.

देवधर्म यात त्यांना काहीच रस नसतो. ज्ञान सांगते की,मी खरा नाही देव खरा आहे. ज्या प्रमाणांत माणसांच्या मी पणाचे, अहंकाराचे खरेंपण कमी कमी होत जाईल. त्या प्रमाणात देवाचे खरेपण त्याच्या अनुभवास येईल. अज्ञानाचे मुख्य कारण असणारा देहाभिमान कमी कमी होत जाणे हें पारमार्थिक प्रगतीचे मुख्य लक्षण होय.

समर्थानी अज्ञानी माणसाला बद्ध असे नाव दिले. तर संपूर्ण आत्मज्ञानी माणसाला त्यांनी सिद्ध म्हणजे प्राप्त झालेला असे नाव दिले.

(क्रमशः)

## वासनेला कसे जिंकता येईल?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

कितीही विद्वान् पंडित जरी झाला तरी त्याला स्वत:ला अनुभव आल्यावाचून ज्ञान सार्थकी लागले असे होत नाही. पोथी ऐकून ज्याला वैराग्य आले त्यालाच पोथी खरी कळली असे म्हणावे. पोथीत सांगितलेले ऐकून ते जो आचरणात आणतो तोच खरा श्रोता होय. वेदान्त हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे, तर त्याचा खरा उपयोग. म्हणूनच सर्व प्रचीतींमध्ये आत्मप्रचीती ही उत्तम होय. जो भगवंताला शरण गेला त्याच्यापाशी शब्दज्ञान नसले तरी, त्याला मिळवायचे काहीच उरत नाही. जो शब्दज्ञानाच्या मागे जातो त्याचा अभिमान बळावतो. जो शब्दज्ञानी नसतो त्याला अभिमान नसेलच असे नाही. अज्ञानी माणसालाही अभिमान असतो, परंतु तो घालविणे सोपे असते. 'सद्गुरूला शरण जा' म्हटले, तर अज्ञानी माणूस मुकाट्याने शरण जाईल; त्याला शंका येणार नाही.

काशीला जाणारे पुष्कळ रस्ते आहेत; पण कोणत्याही रस्त्याने जायचे तरी आपले घर सोडल्याशिवाय जाता येत नाही. हे जसे खरे, तसे कोणत्याही साधनात वासना बाळगून, किंवा ती देवापासून निराळी ठेवून भागणार नाही. ती देवाची करायला, तिला मारायला, देवाचे स्मरण पाहिजे. भगवंताचे होणे हे माझे या जन्मातले मुख्य काम आहे असे समजावे. मी भगवंताचा कसा होईन याचा सारखा रात्रंदिवस विचार करावा. मी दुसऱ्या कोणाचा नाही ही खात्री असली म्हणजे भगवंताचे होता येते. आपले मन वासनेच्या अधीन होऊन तात्पुरत्या सुखाच्या मागे गेल्यामुळे थप्पड खाऊन परत येते. लोक समजतात तितके वासनेला जिंकणे कठीण नाही. आपली वासना कुठे गुंतते ते पाहावे. आपल्या अंगातले रक्त काढून ते तपासून, आपल्याला कोणता रोग झाला आहे हे डॉक्टर पाहातात, त्याचप्रमाणे आपले चित्त कुठे गुंतले आहे हे आपण पाहावे; तो आपला रोग आहे. जी गोष्ट आपल्या हातात नाही तिच्याविषयी वासना करणे वेडेपणाचे आहे, हे ध्यानात ठेवावे. म्हणूनच, विचार आणि नाम यांनी वासनेला खात्रीने जिंकता येईल. मग आपले कर्तेपण आपोआप मरून जाईल. हिमालयावर ज्या वेळी आकाशातून बर्फ पडते त्या वेळी ते अगदी भुसभुशीत असते. पण ते पडल्यावर काही काळाने दगडापेक्षाही घट्ट बनते. त्याचप्रमाणे, वासनाही सूक्ष्म आणि लवचिक आहे, पण आपण तिला देहबुद्धीने अगदी घट्ट बनवून टाकतो. मग ती काढणे फार कठीण जाते. भगवंताची वासना ही वासना होऊच शकत नाही. ज्याप्रमाणे कणीक अनेक वेळा चाळून गव्हाचे सत्त्व काढतात, त्याप्रमाणे विषयाची सर्व वासना नाहीशी झाल्यावर जी उरते, ती भगवंताची वासना होय.

वासना मारायला भगवंताचे अधिष्ठान हा एकच उपाय होय.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## पाप,पुण्य टाळता येते का?

ज्योतिर्मय साहित्य

आपण बहुतांश माणसे, स्वतःच्या इच्छेने, कधीही पाप करू इच्छित नाहीत.मग खरोखर आपल्या हातून पाप घडते का? आणि नेमकं पाप म्हणायचं तरी कशाला ?

असे विविध प्रश्न आपणास वेळोवेळी पडतात.

आपल्या दृष्टीने पाप म्हणजे एखाद्याचा खून करणे, लुट पाट करणे किंवा त्यास मोठ्या प्रमाणात दुखापत करणे. एवढ्यालाच कदाचित पाप म्हणत असावेत. बाकी लोकांचे सोडा पण निदान आपण स्वतः तरी असे पाप करणारे नक्कीच नाहीत. आणि स्वर्गातील आपली जागा पक्की! हे आपण मनोमन ठरविले असते. हा आपला एक गोड गैरसमज आहे.

अध्यात्मिक दृष्टीने श्वासा गणिक कर्मे उत्पन्न होतात. इतरांना मदत करणे हे संत्कृत्य आहे. आणि त्याचे फळ म्हणजे पुण्य आहे. पण याही पुण्याला, पुण्यात्मक पाप असेच म्हणतात.

आपल्या कर्म सिद्धांतानुसार तुम्ही सत्कृत्य करा की दुष्कृत्य करा तुम्हाला त्याचे फळ भोगावेच लागेल. हे भोग केव्हा मिळतील, हे जरी सांगता येत नसले, तरी ते कित्येक जन्मा नंतर का होईना ते भोग, तुम्हाला अगदी निश्चितपणे भोगावे लागतातच. तुम्ही, आम्ही सोडा पण अवतार घेणाऱ्या भगवंताला ही हे भोग चुकले नाहीत.

महाभारताच्या युद्धाच्या वेळी अर्जुन भगवंतास हाच प्रश्न विचारीत होता की, कर्म केले तर त्याचे फळ भोगावे लागते हे तुम्ही एका बाजूने सांगता आणि दुसऱ्या बाजूने तुम्ही मला युद्ध करावयास सांगता यापेक्षा कर्म न केले तर हा प्रश्न सुटेल की नाही?

त्यावेळेस भगवंत त्यास सांगतात की या कर्म भयाने तुम्ही विहित कर्माचा त्याग जरी केला तरी, तुमचा देह व्यापार चालू असल्याने, तुमचा मनोधर्म सुरू असल्याने, त्यात कंपने निर्माण होतील. बुद्धीत संकल्प विकल्पाचे भांडार असेलच.शरिरा द्वारे ही काही कर्मे होतील. मग तुम्ही सुटणार कसे?

जव निरार्तता नाही /तव व्यापारू असे पाही/
मग संतुष्टीच्या ठाई/ कुंठे सहजे/

जोपर्यंत निरीच्छता प्राप्त झाली नाही, तोपर्यंत कर्म करणे हे राहणारच असे समज व आत्म तृप्ती झाली असता कर्म सहज थांबेल.

देखे विहित कर्म जेतुले/ ते सळे जरी वोसंडिले /
तरी स्वभाव काय आणि निमाले/ इंद्रियांचे//

विहित कर्म म्हणजे नित्य आणि नैमित्तिक कर्मे. ही कर्मे हट्टाने जरी सोडली तरी आपला हे कर्म आचरण्या विषयीचा स्वभाव काय संपला?

कर्म पराधीनपणे निपजतसे प्रकृती गुणे/
येरी धरी मोकली अंत करणे वाहिजे वाया// ज्ञाने.३/५९

इंद्रिय, कर्म पराधीनपणे त्रिगुणांच्या योगे कर्मे करीत असतात.

यामुळे ती कर्मे आपल्या हातून घडतात. आणि यात कर्मे घडण्याचा प्रक्रियेला दोषपूर्ण मानता ही येत नाही. कारण आपणास त्याचा दोष केव्हा लागतो तर ही कर्मे देह भावात राहून, आपण मी केली असे समजतो तेव्हा.

तैसी शुभा शुभ कर्मे जी निपजती प्रकृती धर्मे/
ती ये मूर्खी मती भ्रमे/ मी करता म्हणे//

आता आपल्या लक्षात आले असेल की, आपली इच्छा असो वा नसो नित्य नैयमित्तिक कर्मे आपल्या हातून घडणारच आणि याही कर्माचे फळ आपणास भोगावे लागणारच.

आता अध्यात्मात येणारे कर्माचे प्रकार जसे अकर्म, विकर्म आणि निषिद्ध कर्म याचा आपण नेमका अर्थ ओळखायचा प्रयत्न करु.

शब्दांचा अर्थ यासाठी ओळखायचा की यातली कोणती कर्मे टाळावीत. कोणत्या कर्मात काय युक्ती वापरून त्याचा परिणाम कमी करता येतो हे कळेल. **(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**वन्दे परशुरामं तं स्वगोत्रभूषणं परम्।**
**भगवतः शिशुर्वाण्या कायया मनसा तथा।।४१।।**

अशा त्या श्रेष्ठ परशुरामाला, स्वगोत्रभूषणाला मी भगवानमहाराजांचा शिशु वाचा, काया आणि मनाने वंदन करतो.

**अथ श्रीमातृकृपास्मरणम्।**
**यदा यदाऽपदाऽगत्य पीडयति कदापि वा।**
**मातृकृपां हि संस्मृत्य हसाम्यहं तदा तदा।।४२।।**

जेव्हा जेव्हा, केव्हाही संकट येवून मला त्रास देते, तेव्हा तेव्हा मातेच्या कृपेचे स्मरण करून मी हसतो.

**उद्घाटयति सर्वाणि द्वाराणि सैव नायिका।**
**रेणुसुता महाकाली भृगुस्नुषा दयावती।।४३।।**

भृगुस्नुषा, दयावती, रेणुकन्या, महाकाली, अशी ती नायिकाच सर्व द्वारे उघडते.

**पिदधात्यपि सा माया चोद्घाटयति सैव वै।**
**मत्त्वा तस्याः कृपेयं हि लीला वा रचना तथा।।४४।।**

ती माया बंद करते, तीच उघडते; ही तिचीच कृपा, लीला वा रचना मी मानतो.




## जखम झाल्यावर धनुर्वात प्रतिबंधक लस का देतात?

ज्योतिर्मय साहित्य

जखम झाल्यावर धनुर्वात होऊ नये, यासाठी सर्वच डॉक्टर धनुर्वात प्रतिबंधक लसीचे इंजेक्शन देतात.

टिटॅनस टॉक्साईड व टीटीचे इंजेक्शन का देतात, असा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे. जखम झाल्यानंतर त्यात रस्त्यावरची, घरातील, शेतातील माती वा इतर घाण जाऊ शकते.

धनुर्वाताच्या जिवाणूच्या बीजावस्था (स्पोर) असतात. हे जंतू विपरीत अवस्थेत जिवंत राहण्यासाठी बीजावस्थेत जातात या अवस्थेत ते उष्णता, कोरडेपणा यांना सहजगत्या तोंड देऊ शकतात. सुयोग्य वातावरण मिळाल्यास या बीजावस्थाचे रूपांतर धनुर्वाताच्या जंतूमध्ये होते.

हे जंतू मग एक भयंकर विष निर्माण करतात. या विषाचा परिणाम मेंदूवर व स्नायूवर होतो. यामुळे धनुर्वात या रोगात स्नायू कडक होणे, शरीराची कमान होणे, दातखीळ बसणे, झटके येणे अशा गोष्टी पाहावयास मिळतात.

या आजारात मृत्यूचे प्रमाण जरी आता खूप कमी झाले असले तरी, नवजात बालकांमध्ये मात्र मृत्यूचे प्रमाण ८० टक्के इतके आहे.

धनुर्वात होऊ नये, यावर एकमेव खात्रीलायक इलाज म्हणजे धनुर्वाताची लक्षणे ज्या विषामुळे दिसतात त्या विषाचा बीमोड करण्यासाठी प्रतिबंधक लस घेणे.

ही लस घेतल्यानंतर सुमारे २१ ते ३० दिवसांत आपल्या रक्तात धनुर्वाताच्या जंतूच्या विषाविरुद्ध कार्य करणारे प्रतिद्रव्य तयार होते. त्यामुळे धनुर्वात होणे टाळता येते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे: ती म्हणजे, आज घेतलेल्या लसीचा उपयोग महिन्या भरानंतर होतो. धनुर्वाताचा अधिशयन काल काही दिवसांचाही असू शकतो.

साहजिकच जखम झाल्यावर घेतलेल्या टीटीच्या लसीमुळे, त्या जखमेमुळे धनुर्वात होणार असेल तर फारसा उपयोग होत नाही. यासाठी काय करावे ?

लहान मुलांना दीड महिन्यापासून त्रिगुणीच्या लसी द्याव्या. एखाद्याने कोणतीच लस घेतली नसेल, तर महिन्याच्या अंतराने टीटीची दोन इंजेक्शने द्यावी. त्यामुळे त्याला धनुर्वातापासून ५ वर्षे संरक्षण मिळेल.

नंतर दर ५ ते १० वर्षांनी एक इंजेक्शन घ्यावे. अशा प्रकारे आपण केव्हाही होणाऱ्या जखमांपासून उद्भवू शकणाऱ्या धनुर्वाताचा प्रतिबंध करू शकतो.

शस्त्रक्रिया करण्यापूर्वी (शक्य असेल तेव्हा) बाळंतपणाच्या अपेक्षित तारखेच्या आधी सुमारे महिनाभर यासाठीच टीटीचे इंजेक्शन घेणे गरजेचे असते.

डॉ. अंजली दिक्षित व डॉ. जगन्नाथ दिक्षित यांच्या पुस्तकातुन

**

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

हनुमान सीतेला भेटले व चला म्हणाले सीता म्हणाली रामानी येऊन मला न्यावे.

वाल्मीक रामायणात एक गोष्ट केली. त्यांनी सीतेच्या चरित्रावर संशय घेतला. तसा संशय अनेक वाणारांचे मनात होता.मग अग्नी दिव्य केले.राम साईट्स घेऊन अलीकडील समुद्र किनाऱ्यावर आले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

राम रावणाचे युद्ध कसे झाले तर राम रावण युद्ध सारखे. समुद्र कसा आहे तर समुद्रा सारख्या वानर म्हणे ज्या सीता साठी हे भीषण युद्ध केले ती कधी दिसते? मग हनुमानाने योजना केली राम व साईट्स दगडावर बसविले व सर्व वानराना दगडावर बसविले. सर्व वानर रांगेने येत दोघांचे दर्शन घेत. वाट सीता सुंदर नाही म्हणून नाक मुरडत होते. याचे कारण काय तर म्हणे हिला शेपटीच नाही. सौंदर्याच्या व्याख्या ज्याच्या त्याच्या निराळ्या असतात.

राम सीता व लक्मा हनुमंतासाठी अयोध्येत आले भारत भेट झाली. राम प्रथम कैकयीच्या महाली गेले तिचे दर्शन घेतले. पुन्हा रामाचे राज्याभिषेक तिथे एक चित्रकार आला त्याने प्रदर्शन मांडल्याचे सांगितले. सीता गर्भवती होती.तिला अरण्यात राहण्याचे डोहाळे लागले लोकांचा संदेह पाहून राम आणि सीता वाल्मीक ऋषीच्या आश्रमात राहू लागले. कुश लव रान गायन करू लागले. इथवर राम कथा सांगावी असे संकेत आहेत. पुढील भाग उत्तर रामायणात येतो. **(क्रमशः)**

# तरुणांना प्रेरणास्थान क्रांतीकारक बिनोय बसु

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)


बिनोय कृष्ण बसू यांचा जन्म ११ सप्टेंबर १९०८ रोजी बंगालमधील रोहितभोग गावात झाला. हा भाग आता बांगलादेशात समाविष्ठ आहे. त्यांचे वडील रेबोतिमोहन बसु हे इंजिनीअर होते. त्यांच्या आईचे नाव क्षिरोदाबशीनी देवी. बिनोय बसु यांचे शालेय शिक्षण ढाका येथे पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी मिटफोर्ड मेडिकल कॉलेजमध्ये (सर सलीमुल्लाह मेडिकल कॉलेज) प्रवेश घेतला. त्याकाळात ढाकामध्ये राहणाऱ्या स्वातंत्र्यसेनानी हेमचंद्र घोष यांच्या ते संपर्कात आल्याने प्रभावित होऊन बिनोय बसु यांनी मुक्ती संघामध्ये काम करण्यास सुरवात केली. हेमचंद्र घोष यांनी बॉम्ब बनविण्याची कला शिकण्यासाठी पॅरिसला प्रवास केला होता. त्यांनी कलकत्त्याजवळ मानिकतला येथे गुप्त बॉम्ब कारखाना उभारला होता. १९०८ च्या अलीपूर बॉम्ब खटल्यात मुख्य आरोपी म्हणून अरविंद घोष, बारिंद्र घोष यांच्यासोबत त्यांना अटक होऊन आजीवन कारावासाची शिक्षा झाली होती. अंदमानला ते १९०८ पासून शिक्षा भोगत असतानाच १९२१ मध्ये त्यांची सूटका करण्यात आली. पण १९२१ पासून कारवाया करू नये म्हणून ब्रिटीश पोलिसांचा त्यांच्यावर पहारा होता. २२ ऑगस्ट १९०७ रोजी जर्मनीतील स्टुटगार्ट येथे भारतीय ध्वजाचे निर्माते म्हणून हेमचंद्र घोष यांची नोंद आहे. लोकमान्य टिळक आणि अरविंद घोष यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या या स्स्वातंत्र्य योध्याने निर्माण केलेल्या ध्वजाजा वापर भीकाजी कामा यांनी आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत केला होता. त्यांनी बंगालमधील सशस्त्र क्रांतीवरील रिव्हॉल्यूशनरी मुव्हमेंट इन बंगाल हे पुस्तक १९२६ मध्ये लिहीले. त्यांच्या क्रांतीकार्यामुळे ब्रिटीशांच्या कायमच नजरेत असणाऱ्या क्रांतीकारकाने बिनोय बसु यांच्यासारखे अनेक युवा क्रांतीकारक तयार केले.

बिनोय बसु यांनी आपले डॉक्टरकीचे शिक्षण अर्धवट सोडून भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतः ला वाहून घेतले होते. मुक्ती संघात कार्यरत असतानाच बिनोय बसु आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १९२८ मध्ये बंगाल व्हॉलिंटियर्स ही जहाल क्रांतीकारकांची संघटना जॉइन केली व नेतृत्व केले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बिनॉय-बादल-दिनेश या तिघाही स्वातंत्र्य योध्यांच्या स्मरणार्थ कलकत्त्याच्या डलहौजी स्क्वेअरचे नाव ''बिनॉय-बादल-दिनेश बाग'' असे करण्यात आले. त्याचप्रमाणे पश्चिम बंगालची सचिवालय म्हणून जी रायटर्स बिल्डींग आहे, ज्या बिल्डींगमध्ये घुसुन तिघांनीही सिंम्सन यांना ठार केले त्या बिल्डिंगमधील पहिल्या मजल्यावरील भिंतीवर तिघांच्याही नावाची कोनशिला बसविण्यात आली आहे. बिनोय बसु, बादल गुप्ता आणि दिनेश गुप्ता यांच्या स्मरणार्थ बंगालमध्ये नियमीत कार्यक्रम होतात. तिघांनी दिलेले बलीदान देशातील तरुणांना झुंझायला अजुनही प्रेरणा देत आहे. बिनोय बसु यांचा वारसा स्वातंत्र्याची प्रेरणा, निर्भयता आणि देशसेवा आहे. हा वारसा आजही




बंगाल, बांगलादेश, भारतभर गौरवाने जपला जातो. 'रिव्होल्युशनरीजः बिनोय, बादल, दिनेश आणि ब्रिटीशांविरुद्ध लढा या पुस्तकात त्यांच्या क्रांतीकार्यांचा सविस्तर इतिहास दिला आहे. त्याचप्रमाणे बेंगॉल व्हॉल्युनटीअर्स आणि बिनोय कृष्णा बसु, द एपिक ट्रिओ - बेनॉय, बादल आणि दिनेश, बेनॉय बसु चरित्र या पुस्तकांनी त्यांचे महत्व अधोरेखित केले आहे.

दिनेश गुप्ता यांची नात तनिका गुप्ता जी लंडनमध्ये प्रसिद्ध साहित्यिक आणि नाटककार आहे तीने लायन्स ॲन्ड टायगर्स हे नाटक १९३० च्या सिंप्सन यांच्या हत्येवर बसविले आहे, ज्यामध्ये तिघांच्याही कार्याची, घटनांची माहिती आहे. हे नाटक इंग्लंडमध्ये सर्व ठिकाणी गाजतेय. या नाटकाच्या माध्यमातून तनिका गुप्ता यांनी भूतकाळात स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान तसेच ज्या ब्रिटीश देशाने आपल्यावर राज्य करीत अन्याय केला त्याच देशात आपल्या स्वातंत्र्यलढ्याच्या आठवणी जागत्या ठेवल्या आहेत. धन्य ते तरुण क्रांतीकारक बिनोय बसु, बादल गुप्ता



आणि दिनेश गुप्ता ज्यांनी आपले आयुष्य अविवाहीत राहून देशासाठी अर्पण करीत स्वातंत्र्यलढ्याला गती दिली.

# ''जीवन गौरव'' पुरस्काराने सुरेश प्रभुणे सन्मानित

## व्यावसायिकांसाठी त्यांनी केलेले कार्य दीपस्तंभारखे-सचिन जोशी

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** - पुण्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक सुरेश प्रभुणे यांना या वर्षीचा स्टेशनरी,कटलरी अँड जनरल मर्चंट्स असोसिएशन द्वारा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.




सन्मानपत्र,सन्मानचिन्ह, शाल,पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप असून पुण्यातील शुक्रवार पेठेतील नातूबाग गणपती चौक येथील ''वरदश्री'' सभागृहात आठ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता संस्थेच्या सभासदांसाठी झालेल्या वार्षिक सभेमध्ये सुरेश प्रभुणे यांना सपत्निक सन्मानित करण्यात आले.संस्थेचे अध्यक्ष सचिन जोशी यांनी सुरेश प्रभुणे व सौ स्नेहल प्रभुणे यांचा सन्मानचिन्ह,शाल,सन्मानपत्र,पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.व त्यांनी केलेल्या कार्याची प्रशंसा केली.संजय जोशी पुढे म्हणाले,

''पुण्यातील नॅशनल केमिकल्स लॅबोरेटरी मधून २९ वर्षे सेवा केल्यानंतर प्रभुणे सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांचे संघ कार्य चालू आहे.माणसे जोडणारे,सतत कार्यरत,स्पष्ट बोलणारे,असे सुरेश प्रभुणे यांचे व्यक्तिमत्व.अहिल्यादेवी शाळेजवळ छोटेसे दुकाना द्वारे त्यांनी व्यवसाय सुरू केला.मुलांना शिकवले.निवृत्त झाल्यावर अखेरचे वेतन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कार्यास अर्पण केले.

पुण्यातील स्टेशनरी,कटलरी,अँड जनरल मर्चंट्स असोसिएशन च्या कार्यास सुरवातीपासून ते आज पर्यंत सर्व व्यापारी बांधवांना,समाजातील सर्व घटकातील नागरिकांना ते मदत करत असतात.त्यांनी २०१३ व २०१४ ह्या वर्षी संस्थेचे अध्यक्षपद ही भूषविले.गेले ४०- ४५ वर्ष ह्या संस्थेबरोबर कार्यरत असून त्यांच्या अध्यक्षकाळामध्ये सभासदांना गुढी पाडवा निमित्ताने शुभेच्छा पत्र तसेच मकरसंक्रांती निमित्त सभासदांना प्रत्यक्ष तिळगुळ देणे,स्नेह मेळावा घेणे,असे उपक्रम लोकप्रिय झाले होते.दिवाळी संपर्क पत्रिका जास्तीत जास्त पानामध्ये काढण्याचा विक्रम करून संस्थेला उत्पन्न मिळवून देणारा उपक्रम अजूनही चालू आहे.''

सत्काराला उत्तर देतांना सुरेश प्रभुणे म्हणाले,'' या संस्थेच्या कार्यास मला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची प्रेरणा मिळाली.कै रामभाऊ म्हाळगी यांच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेने मी घडलो.त्यांनी सांगितलेल्या कार्यकर्त्यांच्या डोक्यावर बर्फ,जिभेवर साखर व पायाला भिंगरी'' त्रिसूत्री मंत्राने मी आयुष्यभर कार्य केले.१९६० पासून संघाच्या कामात आहे. पू .गोळवलकर गुरुजी,तात्या बापट,बाबाराव भिडे,जगन्नाथराव जोशी,रामभाऊ म्हाळगी यांचे मार्गदर्शन लाभले.बँक ऑफ महाराष्ट्र मधील वरिष्ठ अधिकारी सदानंद भागवत यांच्या मदतीमुळे व्यवसाय यशस्वी करू शकलो.तळजाई शिबिर,हिंजवडी शिबिर,मोतीबाग प्रकल्प अशा अनेक संघाच्या सेवा कार्यात मला प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो.''

# रसशेवई

हा एक खास कोकणी पदार्थ आहे . विशेषत: तळकोकणात, सिंधुदुर्ग ,रत्नागिरी भागात जास्त प्रमाणात बनवला जातो . कोकण म्हटले की भातशेती , नारळाची झाडे , समुद्र असे सर्व डोळ्यांसमोर येते ना ? म्हणूनच तिकडे मासे , समुद्रातील खेकडे वगैरे ..आणि शाकाहारी लोकांसाठी तांदूळ , नारळापासून बनवलेले असंख्य पदार्थ बनवले जातात . आज आपण तिथला खास पद्धतीने बनवलेला पदार्थ बनवू . चला मग ..






**साहित्य :** १ वाटी तांदुळाची पिठी , १ मोठा नारळ , पाव चमचा जायफळ पावडर , साधारण पाऊण वाटी बारीक केलेला गुळ ,चवीनुसार मिठ , २..३ चमचे साजूक तूप .

**कृती :** सर्वांत आधी जास्त जुना नाही ,नवा नाही असा मध्यम आणि शक्यतो सुवासिक असलेला तांदूळ छान २..३ वेळा स्वच्छ पाण्याने धुवून निथळून घ्यावा . मग तो जाड कापडावर पातळ पसरावा आणि सावली मध्ये व्यवस्थित सुकवावा . नंतर एकदम बारीक दळून घ्यावा व बारीक रवापीठीच्या चाळणीने चाळून पीठी बनवून घ्यावी . नारळ खवून त्याचे मध्यम दाट दूध बनवावे . त्यात गुळ घालून जायफळ पावडर घालावी व चवीसाठी किंचीत मिठ घालून गुळ छान विरघळून घ्यावा . व हा रस तयार करून ठेवावा . आता तांदुळाची उकड काढून घेण्यासाठी प्रथम गॅसवर जाड बुडाचे भांडे ठेवून त्यात १ वाटी पाणी उकळायला ठेवावे . त्याला छान उकळी आली की मग त्यात १ चमचा तूप घालून तांदुळाची पिठी घालावी व लाकडी दांड्याने किंवा लाटण्याने ,लाकडी उलथण्याने

भराभर हलवावे म्हणजे गाठी होणार नाहीत आणि मग त्यावर लगेंच झाकण ठेवून २ मिनिटे मंद आचेवर मस्त दणदणीत वाफ काढावी .मग परातीत एक स्वच्छ सूती कापड पसरून त्यावर पाण्याचा हलका शिडकवा करावा व मग ही उकड त्यावर घालून किंचित पाणी शिंपडून कपड्याची पुरचुंडी करावी व हाताला थंड पाणी लावून हलक्या हाताने सर्व

छान एकत्र करून गोळा बनवावा . कपड्याला पाणी लावल्यामुळे ते चिकटत नाही आणि हाताला पोळत पण नाही . मग लगेंच तो गोळा परातीत काढून घेऊन किंचीत पाणी हाताला लावत तळव्याने दाबत छान मळून घ्यावे .

आता गॅसवर एका मोठ्या पातेल्यात भरपूर पाणी उकळायला ठेवावे . तोपर्यंत ही उकड छान मळून त्याचे लांबट गोळे बनवावेत व शेवटी मध्यभागात चारी बोटे दाबून मुटके बनवावेत .

आता पातेल्यातील उकळलेल्या पाण्यात ते सोडावेत . सुरुवातीला ते जड असल्यामुळे तळाशी बसतात पण थोड्यावेळाने शिजले की हलके होतात आणि मग वरती तरंगतात. म्हणजे हे शेवया बनवण्यासाठी तयार झाले असे समजावे .

मग हे गरम गरम मुटके शेवपात्रात घालून किंवा सोऱ्यात शेवेची चकती घालून त्यात घालून ताटात तुपाचा हात लावून किंवा केळीच्या पानांवर शेव पाडून घ्यावी व ती थंड होऊ द्यावी. आता एका पसरट खोलगट डिशमध्ये शेवया घालाव्यात मग त्यावर नारळाचे दूध.. गुळाचा बनवलेला रस भरपूर घालावा वरून आवडत असेल तर तूप घालून ही डिश सर्व्ह करावी .


**वैशिष्टय:**

ही गोड कोकणात बनणारी खास डिश आहे . कमीतकमी साहित्यात बनणारी सुरेख डिश तेलकट , तळकट नसल्यामुळे अतिशय हेल्दी आहे . नारळाच्या दुधाची अफलातून चव , गुळाची गोडी , जायफळाचा मंद सुगंध , सुगंधी तांदुळाचा सुवास यामुळे ही डिश कमालीची टेस्टी बनते . नक्की करून पाहाच .










# ज्ञानेश्वरी: आत्मनिर्भर जीवनाची गुरुकिल्ली

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)


तुम्ही एखाद्या मोठ्या प्रकल्पावर काम करत आहात याचे चांगले परिणाम मिळतीलच. पण अचानक त्यात काही अडचणी येतात किंवा तो प्रकल्प यशस्वी होत नाही. जर तुम्ही फक्त त्याच्या अंतिम यशावर अवलंबून असाल तर तुम्ही निराश व्हाल. त्याऐवजी, जर तुम्ही फक्त तुमचे काम प्रामाणिकपणे केले असेल आणि फळाचा विचार केला नसेल, तर तुम्हाला अपयशाने निराश वाटणार नाही. तुम्ही शिकलेल्या अनुभवावर लक्ष केंद्रित करून पुढे जाल.

आर्थिक नियोजन: वैराग्याची शिकवण

वैराग्य म्हणजे गोष्टींवरची आसक्ती कमी करणे. याचा अर्थ, पैसा, वस्तू किंवा इतर भौतिक गोष्टींवर जास्त अवलंबून न राहता स्वतःच्या आंतरिक आनंदावर आणि समाधानावर लक्ष केंद्रित करणे. आजच्या जगात अनेक लोक केवळ महागड्या वस्तू, गॅजेट्स किंवा कपडे खरेदी करून आनंद शोधतात. पण ज्ञानेश्वरी सांगते की हा आनंद तात्पुरता आहे. खरा आनंद तुमच्या आत आहे. जेव्हा तुम्ही फक्त वस्तूंच्या मागे न धावता, आपल्या कौशल्यांवर, ज्ञानावर् आणि कुटुंबावर लक्ष केंद्रित करता, तेव्हा तुम्ही आर्थिकदृष्ट्या अस्थिरता असूनही मानसिकदृष्ट्या अधिक स्थिर आणि आनंदी राहता. हेच खरे आत्मनिर्भर होणे आहे.

संकटांना सामोरे जाणे

आत्मज्ञानाने माणूस स्वतःचे सामर्थ्य



ओळखतो आणि बाह्य परिस्थितीने विचलित होत नाही.

तुम्ही तुमच्या नोकरीत अचानक




आलेल्या आर्थिक मंदीमुळे काढून टाकले गेल्याने संकटात सापडले आहात. अशा परिस्थितीत, जर तुम्ही तुमच्या आतल्या ताकदीवर आणि कौशल्यांवर विश्वास ठेवला तर तुम्ही निराश होणार नाही. तुम्ही तुमच्या अनुभवाचा वापर करून नवीन नोकरी शोधाल किंवा स्वतःचा व्यवसाय सुरू कराल. हे आत्मबळ तुम्हाला संकटातून बाहेर पडायला मदत करेल. तुम्ही तुमच्या कौशल्यांवर आणि स्वतःच्या प्रयत्नांवर अवलंबून राहता, दुसऱ्यांच्या मदतीची वाट पाहत नाही. ज्ञानेश्वरीतली शिकवण ही केवळ पोथी-पुराणात ठेवण्यापुरती नाही, तर ती आपल्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक टप्प्यावर आपल्याला मार्गदर्शन करते.

# दवाखाना

## कुष्ठरोग – भाग २

ज्योतिर्मय 📖 साहित्य

नमस्कार मैत्रांनो!

कुष्ठरोग हा सावकाश पसरणारा जिवाणूजन्य संसर्गरोग आहे. याला कारणीभूत असलेले मायकोबॅक्टेरियम लेप्रे आणि मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसिस (हे क्षयरोगाचे जिवाणू) सूक्ष्मदर्शकाद्वारे पाहण्यासाठी असिड फ़ास्ट विरंजक (असिड-फास्ट स्टेनिंग) ची गरज असते. म्हणून हे दोन्ही जिवाणू असिड फास्ट जिवाणू असे वर्गीकृत केले जातात. या ग्राम-पॉझिटिव्ह जिवाणूंना मेणासारख्या लिपिड-समृद्ध भिंतींचे कवच लाभले असते. कांही प्रतिजैविके हे कवच भेदू शकतात. या दोन्ही रोगांमुळे पेशींमध्ये विशिष्ट असे कणीदार फुगवटे (ग्रॅन्युलोमा) होतात, हे ग्रॅनुलोमा रोगप्रतिकारक पेशींचे समूह असतात. दोहोंचे चार व्हायला क्षयरोगाचे जिवाणू १६-२० तास घेतात तर कुष्ठरोगाचे आळशी जिवाणू हेच पुनरुत्पादन करायला १२-१४ दिवस घेतात. मंडळी, जिवाणूंचे हे जीवनचक्र उपचारांचे नियोजन करतांना महत्वाचे ठरते.

अनेक वर्षे आपल्या समजुतीप्रमाणे फक्त मानवामध्ये आढळणाऱ्या या रोगाची लागण अल्प प्रमाणात अमेरिका निवासी आर्मांडिलो नामक अंगावर खवल्यांच्या सात किंवा नऊ ओळी असलेल्या सस्तन प्राण्यांत झाल्याचे दिसून आले आहे. या प्राण्यांची शिकार करणे, त्यांना हाताळणे किंवा त्यांचे मांस खाणे यामुळे कुष्ठरोगाच्या संसर्गाचा धोका वाढू शकतो असे संशोधनात आढळले आहे. कुष्ठरोग हा प्राणघातक रोग नाही. तसेच या रोगासोबत दुसऱ्या रोगाचे, अगदी क्षयरोगाचे देखील प्रमाण वाढलेलं दिसत नाही. हा रोग प्राणघातक नसूनही वेळीच उपचार न केल्यास संसर्गामुळे बाधित व्यक्तीत शारीरिक व्यंग निर्माण होते.

कुष्ठरोगाची लक्षणे: कुष्ठरोगाचे जिवाणू मुख्यत्वेकरून शरीराच्या निम्नलिखित उतींवर आक्रमण करतात. त्यामुळे रोग्यात संबंधित लक्षणे दिसून येतात

*परिधीय मज्जा (मेंदू आणि पाठीच्या कण्याच्या बाहेर असलेली मज्जासंस्था): चेतांची (नर्व्हज) टोके बाधित झाल्याने संबंधित भागांची संवेदना नष्ट होते. हातापायांच्या बोटांची संवेदना नाहीशी झाली म्हणजे ते सुन्न होतात. साहजिकच त्यांना इजा झाल्याचे रोग्याच्या ध्यानात येत नाही. त्यातच जखमांमध्ये जिवाणू वाढतात आणि उघड्या जखमा होतात. परिणामस्वरूप उघड्या जखमांचे पर्यावसान गँग्रीनमध्ये होते आणि उती (टिश्यू) मृत होतात. अशाने अवयव विद्रूप होतातच, शिवाय हातापायाची बोटे वाकडी होतात किंवा गळून पडतात. मैत्रांनो, उपचार न केलेल्या कुष्ठरोग्यात प्रामुख़्याने हात-पाय विद्रूप झालेले आढळतात. संवेदना नसल्यामुळे कुष्ठरोग्याला वेदना होत नसाव्यात असा चुकीचा समज आहे. बहुतेक रोग्यांना परिघवर्ती चेतांची टोके बाधित झाल्याने संबंधित जागी दाह जाणवतो. समाजाकडून निष्कासित झाल्यावर हे विकलांगांचे जिणे सदर रुग्णाला मरणप्राय यातना देत असते. विचार करा, हाच रोग जर लहान मुलाला झाला तर? एका कळीचे उमलण्याआधीच असे अंतर्बाह्य कुस्करल्या जाणे अतिवेदनादायक असते.






लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव


*चामडी/त्वचा त्वचेवरील डाग: कुष्ठरोगाचे दुसरे प्रमुख लक्षण असलेले हे डाग विविध आकारांचे आणि वैशिष्ट्यपूर्ण असतात. त्यांची कड गडद रंगाची आणि मध्यभाग फिकट रंगाचा दिसतो. इतकेच नव्हे तर हे जिवाणू त्वचेला खोलवर बाधित करीत असल्याने केसांची मुळे, घाम येणा-या ग्रंथी आणि संवेदी चेता यांचा नाश होतो. परिणामी त्वचा कोरडी, रंगहीन बनते आणि भुवयांचे केस नाहीसे होतात.


*श्लेष्मल त्वचा (म्युकस मेम्ब्रेन): या रोगात नाकाची श्लेष्मल त्त्वचा, घसा, वरच्या श्वसनमार्गाची श्लेष्मल त्वचा बाधित होतात. त्यामुळे नाकात अडथळा येणे, त्यातून रक्तस्त्राव होणे आणि वासाची भावना कमी होणे या लक्षणांचा समावेश असू शकतो.


कुष्ठरोग्याच्या शरीरातील हे अस्वाभाविक बदल अर्थात विकृतिस्थल (डिफॉर्मिटी) अन्यत्र आढळत नाहीत आणि नेमक्या याच लक्षणांमुळे त्याच्याविषयी समाजाला घृणा वाटते. हा प्रकार सर्वदूर पसरलेला आहे. उदाहरणच द्यायचे तर लेखासोबत कुष्ठरोग्याचे मध्ययुगीन काळातले (अंदाजे इ. स. १४००) एक प्रसिद्ध प्रतीकात्मक चित्र आपल्यासोबत शेअर करते आहे. कोण्या एका प्रतिष्ठित पाश्चात्य देशातील समाजाद्वारे बहिष्कृत केलेला हा एक कुष्ठरोगी भिकारी आहे. चेहेऱ्यावर आणि शरीरावर डाग, हातापायाची बोटे झडल्याने त्यांना चिंध्या गुंडाळलेल्या दिसत आहेत. हातात एक धोका दर्शवणारी घंटा आहे. आजूबाजूने ये जा करणाऱ्यांना तो घंटा वाजवून त्याच्यापासून अंतर राखण्यासाठी सचेत करतोय!

पुढील कांही भागात याच रोगाविषयी चर्चा करू या!

# कवितेच्या लाटावर...















# स्त्रियांची कामं; आम्ही खरंच दयावान आहोत का?

ज्योतिर्मय 📖 साहित्य

स्त्री...... स्त्रियांचा आजचा काळ पाहिल्यास आपल्याला दिसतं की आजची स्त्री घरी बरीच कामं करते. ती सकाळी उठते व उठल्याबरोबर सडा सारवण करते. त्यानंतर मुलांची सकाळी शाळा असेल तर त्यांच्या शाळेची तयारी करुन देते. त्यामध्ये मुलांची अंघोळ, त्यांची केशसज्जा, त्यांना कपडे घालून देणे, त्यांना नाश्ता करवणे व सोबत आपलं मुल शाळेत उपाशी राहू नये यासाठी त्याला जेवनाचा डबा देणे. इत्यादी कामं करते. मुल शाळेत गेलं की ती दात घासते. त्यानंतर अंघोळ करुन पुन्हा ती स्वयंपाक करते. ती जेव्हा स्वयंपाकाला बसते. तेव्हा तिचा पती उठलेला असतो व त्याचं दातवन झालेलं असतं. तेव्हा ती लगेच त्याच्या पुढ्यात चहा ठेवते व पुन्हा घरात जावून स्वयंपाक तयार करते. हे करीत असतांना त्यादरम्यान ती आपल्या पतीच्या अंघोळीसाठी पाणीही चाकते व ते पाणी स्नानगृहात नेवून देते. साधी निकर आणि बनियान सुद्धा काही काही घरातील पती घेत नाहीत. तेही देते. त्यासोबत टॉवेलही. लगेच पतीची अंघोळ झाली की त्यांच्यासमोर जेवनाचा ताट देते. त्यातच ती स्वतःही जेवन घेते. त्यानंतर ती पतीचा डबा तयार करुन त्यांना बांधून देते. आपलाही डबा बांधते व कामाला जाते. सायंकाळी घरी येताच पुन्हा ती तीच कामं करते. फक्त अंघोळ आणि सडा सारवण सोडलं तर.

महिलांची कामं. केवळ सडा सारवण करणं एवढीच नाहीत तर त्यासोबत भांडे घासणे, कपडे धुणे, फरशी पुसणे, झाडांना पाणी देणे. वरुन कामाला जाणे. त्यातच मुलांच्या शाळेची तयारी करणे. त्यांचा अभ्यासही घेणे. ही कामं करीत असतांना नाकी नव येत असतं आणि अशी कामं करुन तिला आपल्या पतीची नेहमी वटवट ऐकावी लागते. कधीकधी आपली ननद, सासू सासरे, भासरे वा दिर यांचीही ग्राऱ्हाणी ऐकावी लागतात. मग विचार येतो. विचार येतो की काय हे आयुष्य! इश्वरानं स्त्रियांना यासाठीच जन्माला घातलं की काय? अशा किळसवाण्या वातावरणात आजची स्त्री जगत असते. काही काही घरातील लोकं समजदार असतात. ते आपल्या पत्नींना कामात मदत करतात. कधीकधी तेच आपल्या पत्नींची कामं करीत असतात. त्यांनाही कळतं की आपल्या पत्नीला किती त्रास होतो ते. परंतु काही काही घरचे पती हे आपल्या पत्नींचे कामाच्या बाबींतून रक्तच पिण्याचे काम करतात. जसे ते ढेकुणच लागले.

स्त्रियांच्या कामाबाबतीतील शहराची स्थिती थोडीशी बरी आहे. शहरात पती पत्नी दोघंही कामाला जातात व दोघंही घरची कामं करीत असतात. पत्नी जर स्वयंपाक बनवीत असेल तर पती कांदे, मिरचे वा भाजीपाला कापून देतो. पत्नी जर भाजीपाला कापत असेल तर पती स्वयंपाक बनवतो. त्याचं कारण असतं, त्यांच्याजवळ मायबाप नसणं. शहरात बऱ्याचशा घरी म्हातारी मंडळी व ननद, दिर नसतात. बऱ्याचशा घरी सासु सासरे हे वृद्धाश्रमातच असतात. त्यातच पत्नी नोकरी करीत असल्यानं, तिला कवेत छेवू की डोक्यावर ठेवू. असं शहरातील तरुणांना वाटत असतं. तसं पाहिल्यास मायबापाच्या सेवेचे संस्कार आजुबाजूला पाहून तुटलेलेच असतात. ते पती पत्नी शिकलेले असतात. औपचालीक शिक्षण अर्थात चाकोरीबद्ध शिक्षण हे उच्चप्रतीचे घेतलेले असते. परंतु संस्कारी शिक्षण त्यांना बालपणापासून मिळालेले नसते. ही स्थिति ग्रामीण भागात नसते. ग्रामीण भागातील स्त्रियांना कामाचा ताण जास्त असतो.

ग्रामीण भागातील स्त्रियांवर संस्कार असतो. सासू सासरे हे वृद्धाश्रमात नसतात. कारण तसे सासूसासरे वृद्धाश्रमात ठेवल्यास समाज त्यांना दुषणे देत असतो. कधीकधी गावातील माणसं मुलांनी असं केल्यावर त्यांना वाळीत टाकत असतात. ज्यातून गावातील मुलं आपल्या आईवडीलांना वृद्धाश्रमात टाकत नाहीत. ते घरीच ठेवतात. मात्र काम करतांना त्यांच्या पत्नीची सतत तारांबळ उडत असते. कारण गावात संस्कार असतात की पतीनं काम न करणे. पतीला गावात परमेश्वराचा दर्जा असतो. जो शहरात नसतो. त्यामुळं पतीची सेवा म्हणजे इश्वरसेवा असं मानलं जातं. विशेष म्हणजे महिला ही शहरातील असो की ग्रामीण. महिलांना दुय्यमच दर्जा असतो. तीच जास्त काम करते. घरी आणि कार्यालयातही. तरीही तिचा छळच होत असतो. तिला घरी आणि कार्यालयातही जास्तच राबवलं जातं. राबवतो कोण? तर तोच पुरातन विचारांचा पुरुषसत्ताक समाज. तेच ते पुरुषसत्ताक विचार. जे कधीच बदलणारे नाहीत. आता लोकं म्हणतील की आम्ही महिलांना कामात मदत करतो. परंतु मदत करणं वेगळं आणि कामं करणं वेगळी. आपण महिलांना अर्धांगीणी समजतो ना. मग कामंही अर्धीच करावी ना. परंतु आपण आपलं वागणं मनात एक व ओठावर एक ठेवत आपण तिची गळचेपी करतो. कामाच्या बाबतीत सांगायचं झाल्यास स्वतः सुख भोगतो आणि तिला दुःख देतो. आपण ऐतभाऊ भुमिका ठेवतो व तिला कामाला जुंपतो. वरुन जगात आपल्यासारखा दयावान कोणी नाही असा कांगावा करतो. परंतु हे आपले वागणे बरोबर नाही. आपण खरं तर स्त्रियांची दया घेतलीच पाहिजे. आपण दयावान असलेच पाहिजे. गोष्टी सांगण्याऐवजी घरची अर्धी कामं केलीच पाहिजे. तेव्हाच खऱ्या अर्थानं स्त्री सुखी होईल व तिचाही खऱ्या अर्थानं सन्मान झाला असं मानता येईल हे तेवढंच खरं.

***

अंकुश शिंगाडे
नागपूर
मो.९३७३३५९४५०

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559